जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, यवतमाळ चे रुपांतर मॉडेल करिअर सेंटर मध्ये करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उदयोजकता विभाग
शासन निर्णय क्रमांकः कौविउ-२०१५/प्र.क्र.११८/भाग-२/रोस्वरो-१
२ रा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २० जानेवारी, २०१६

वाचा -

१) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय यांचे पत्र क्र. कौविरोवउसं-९/मॉकसे/७८७१ दि.२८सप्टेंबर,२०१५
२) रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय ,श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.DGE&T-V-११०११/०१/२०१४-MMPCell- Maharashtra दि.०२ सप्टेंबर, २०१५
३) वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.अथसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दि.१६ जानेवारी, २०१६

प्रस्तावना -

देशातील युवकांच्या भविष्यातील प्रगतीच्या दृष्टीने त्यांनी उत्तम कौशल्य प्राप्त करुन घेऊन सुयोग्य रोजगाराची (Career) निवड करावी यादृष्टीने केंद्र शासनाद्वारे उभरत्या युवाशक्तीच्या रोजगारविषयक मार्गदर्शनावर (Career Counselling) विशेषत्वाने लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय (DGE&T) तसेच श्रम व रोजगार मंत्रालय यांच्यामार्फत "राष्ट्रीय करिअर सेवा" (National Career Service) ही योजना मंजूर करण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत रोजगार विषयक विविध सेवा पुरविण्याचे प्रयोजन आहे. त्याअंतर्गत केंद्र शासनाद्वारे प्रत्येक राज्यामध्ये एक सर्वसमावेशक असे "मॉडेल करिअर सेंटर" स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. या "मॉडेल करिअर सेंटर"मार्फत कौशल्यावर आधारीत रोजगारांच्या संधीचा/मागणीचा शोध घेवून युवावर्गातील प्रशिक्षणार्थींना त्यांच्या कल- क्षमतेनुसार प्रशिक्षण तसेच रोजगाराच्या संधीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे, तसेच संबंधितांना रोजगार मिळण्यासाठी नियोक्त्यांच्या संपर्कात आणण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने प्रत्येक राज्यात किमान एका रोजगार मार्गदर्शन केंद्राचे रुपांतर "मॉडेल करिअर सेंटर" मध्ये करण्याचे निश्चित केले असून यासाठी केंद्र शासन योजनेच्या प्रथम वर्षात आर्थिक सहाय्य करणार आहे. केंद्र शासनाने मॉडेल करिअर सेंटर मध्ये रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात यवतमाळ जिल्हयातील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राची निवड केली आहे. यानुषंगाने केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालय, रोजगार महासंचालनालयाच्या संदर्भ क्र.२ येथे नमूद दि.०२सप्टेंबर,२०१५ च्या पत्रानुसार केंद्र शासनाने रु.३८,०१,२६१ (रुपये अडतीस लाख एक हजार दोनशे एकसष्ट फक्त) इतका निधी मंजूर केला आहे व प्रथम टप्प्यात त्यापैकी रु.२२,८०,७५७/- (रु. बावीस लाख ऐंशी हजार सातशे सत्तावन्न फक्त) इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या या निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,यवतमाळचे रुपांतर "मॉडेल करिअर सेंटर" मध्ये करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती व त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय-

केंद्र शासनाच्या रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय (DGE&T) व श्रम व रोजगार मंत्रालय यांच्यामार्फत राबविण्यात येणा-या " राष्ट्रीय करिअर सेवा (National Career Service) " या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या मंजूरीनुसार राज्यातील यवतमाळ जिल्हयामधील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांचे रुपांतर "मॉडेल करिअर सेंटर" मध्ये करण्यास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यात स्थापन करावयाच्या "मॉडेल करिअर सेंटर" या योजनेचा उद्देश, मॉडेल करिअर सेंटरद्वारे पुरविण्यात येणा-या सेवा, योजनेतील केंद्र शासनाचा सहभाग, राज्य शासनाचा सहभाग इ.बाबतचा सविस्तर तपशील पुढील नमूद विवरणपत्रानुसार आहेः-

अ.क्र.	मुद्दयांचे नाव	मुद्दयांबाबत सविस्तर माहिती
१.	योजनेचे नाव व अंमलबजावणीचे ठिकाण	महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे रुपांतर" मॉडेल करिअर सेंटर "मध्ये करणे.
२.	योजनेचा उद्देश	ग्रामीण, स्थानिक तसेच निमशहरी भागातील रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी, तंत्रज्ञानाचा वापर करुन समुपदेशन आणि प्रशिक्षण पारदर्शीरित्या व प्रभावी पध्दतीने उपलब्ध करुन देणे.
३.	करिअर सेंटरमार्फत देण्यात येणा-या सेवा	**१.** रोजगार बाजार क्षेत्राचा अभ्यास करुन रोजगारांच्या संधीचे अंदाज वर्तविणे. **२.** उमेदवारांना त्यांचे कौशल्य, स्वारस्य आणि मागणीचा विचार करुन समुपदेशन करणे. **३.** मनुष्यबळाच्या मागणीनुसार, रोजगारक्षम व कौशल्ययुक्त मनुष्यबळाची सांगड घालणे. **४.** केंद्रामार्फत पुरविण्यात येणा-या विविध सेवा सुविधांचा विविध मार्गाने प्रचार व प्रसिध्दी करणे.
४.	मॉडेल करिअर सेंटर अंतर्गत केंद्र शासनाचा सहभाग	१.करिअर सेंटर स्थापन करण्याकरिता करिअर समुपदेशकाची (कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता अधिकारी) विविध प्रशिक्षणाद्वारे क्षमता बांधणी करणे. २.उमेदवारांचे व्यवसाय समुपदेशन करण्याच्या दृष्टीने अधिका-यांना सहाय्य करण्यासाठी मूल्यमापन किट व हिंदी आणि स्थानिक भाषेतील अन्य संदर्भ साहित्य उपलब्ध करुन देणे. प्रमाणित कार्यपध्दती, मानसशास्त्रीय मूल्यमापन व अभिक्षमता चाचण्या, मूल्यमापन कीट, वांरवार विचारले जाणारे प्रश्नसंच, रोजगार निवडीसंदर्भात द्रुकश्राव्य साहित्य इ.उपलब्ध करुन देणे. ३.स्थानिक स्तरावर रोजगार मेळावे आयोजित करण्यासंदर्भातील आदर्श कार्यपध्दती, स्थानिक उदयोजकांची सूची इ. मोबाईल व्हॅनसाठी जाहिराती

अ.क्र.	मुद्दयांचे नाव	मुद्दयांबाबत सविस्तर माहिती
		अंतर्भूत असलेल्या मार्गदर्शन सूचना, सदरची सेवा जास्तीत जास्त लोकांपर्यन्त पोहोचण्याकरिता आदर्श कार्यपध्दती यासारखी संसाधने (tools) व सहाय्य उपलब्ध करुन देणे. ४.मॉडेल करिअर सेंटरची स्थापना करणेकरिता सर्वप्रकारचे सहाय्य व मार्गदर्शन करणे. ५.तरुण व्यावसायिक तज्ञाची (Young professional & Counsellor) मदत एक वर्षाकरिता उपलब्ध करुन देणे. सदरचे तरुण व्यावसायिक तज्ञ संबंधित मॉडेल करिअर सेंटर च्या कार्यक्षमतेबाबत नियमितरित्या अहवाल सादर करतील व तो सर्व सहभाग धारकांना उपलब्ध करुन देतील. ६.मॉडेल करिअर सेंटरसाठी नॅशनल करिअर सर्विसेस पोर्टेल उपलब्ध करुन या वेबपोर्टलच्या माध्यमातून माहिती उपलब्ध करुन देणे . ७.कॉल सेंटर व हेल्प डेस्क सेवा अंतर्गत राष्ट्रीय स्तरावरील दूरध्वनी क्रमांक रोजगार इच्छूक व करिअर घडवू इच्छिणा-या उमेदवारांकरिता उपलब्ध करुन देणे. ८.केंद्र शासनाच्या विविध योजना यांची माहिति रोजगार इच्छुक उमेदवारांना पुरविणे.
५.	राज्यशासनाची भूमिका व सहभाग	१.मॉडेल करिअर सेंटर स्थापन करुन ते भविष्यात कार्यरत राहण्याच्या दृष्टीने राज्य शासनाकडून व्यवस्थापन करण्यात येईल. २.आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. ३.सहायक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, यवतमाळ जिल्हा हे यवतमाळ जिल्हयात या योजनेची अंमलबजावणी करतील. ४.आयुक्त ,कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता संचालनालय हे आवश्यकतेनुसार सहायक संचालक, जिल्हा यवतमाळ यांना निधी उपलब्ध करुन देतील व सदर निधीकरिता ते आहरण व संवितरण अधिकारी राहतील. ५.आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय हे या योजनेचा वेळोवळी आढावा घेतील व संनियंत्रण करतील व आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देतील.

अ.क्र.	मुद्दयांचे नाव	मुद्दयांबाबत सविस्तर माहिती
६.	आढावा व देखरेख सनियंत्रण	योजनेच्या यशस्वितेचा निकष हा किती उमेदवारांचे मूल्यमापन झाले, अभिक्षमता चाचणी झाली, समुपदेशन झाले, किती शाळांमध्ये समुपदेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला, किती रोजगार मेळावे झाले, किती क्षेत्रीय उपक्रम (Outreach Activities) आयोजित केले, किती रिक्तपदे प्राप्त करुन घेतली, कितीजणांना रोजगार प्राप्त झाला, रोजगारांच्या संधी प्राप्त झाल्या यावर अवलंबून राहील. मॉडेल करिअर सेंटरच्या प्रगतीचा आढावा तसेच देखरेख नॅशनल करिअर सेंटर या वेबपोर्टल मार्फत वेळोवेळी करण्यात येईल.
७.	मॉडेल करिअर सेंटरसाठी मनुष्यबळाचे नियोजन	मॉडेल करिअर सेंटर साठी नव्याने पद निर्मिती करण्यात येणार नाही. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,यवतमाळ येथे कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी मॉडेल करिअर सेंटरचे कामकाज पाहतील. सदर योजनेअंतर्गत एका व्यावसायिक तज्ञ/समुपदेशक यांच्या सेवा केंद्र शासनाच्या रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय (DGE&T) यांचेकडून १ वर्षाकरिता उपलब्ध करुन देण्यात येतील.
८.	आर्थिक नियोजन	यवतमाळ जिल्हयात मॉडेल करिअर सेंटर सुरु करण्यासाठी केंद्र शासनाकडून सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात रु.३८,०१,२६१/- (रुपये अडतीस लाख एक हजार दोनशे एकसष्ट फक्त) एवढे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. मंजूर रक्कमेतील ६०% रक्कम म्हणजे रु.२२,८०,७५७/- (रु.बावीस लाख ऐशी हजार सातशे सत्तावन्न फक्त) केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या दि.०२ सप्टेंबर,२०१५ च्या पत्रान्वये वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम दुस-या हप्त्यात २०% व तिस-या हप्त्यामध्ये २०% अशा पध्दतीने वितरीत करण्यात येईल. यासंदर्भात DGE&T यांनी दि.१०.१२.२०१४ रोजीच्या आदेशान्वये तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशामधील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.
९.	योजनांतर्गत खरेदी	या योजनेतर्गत करावयाची खरेदी ही राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार व कार्यपध्दतीचा अवलंब करुन करण्यात येईल. तसेच याविषयीचे कार्यालयीन आदेश निर्गमित करणे, देयके अदा करणे व इतर संबंधित सर्व कामकाज आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय यांच्यामार्फत पार पडले जाईल.

अ.क्र.	मुद्दयांचे नाव	मुद्दयांबाबत सविस्तर माहिती
१०	योजनेची पुढील कृती	आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय हे सदर योजनेचा आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल राज्य शासनास सादर करतील व तद्नंतर सदर मॉडेल करिअर सेंटर पुढील वर्षासाठी चालू ठेवण्यासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. “मॉडेल करिअर सेंटर” स्थापन करणे, ही योजना राबविण्यासाठी मागणी क्र. झेड- ०१, प्रधान लेखाशीर्ष २२३०- कामगार व सेवायोजन,०२ सेवायोजन सेवा, (००१) संचालन व प्रशासन, (०१) कौशल्य विकास, रोजगार व संचालनालय(सेवायोजन संचालनालय), (०१)(१०) मॉडेल करिअर सेंटर (२२३० अे०११) (योजनांतर्गत) ३१, सहायक अनुदाने(वेतनेत्तर) हे लेखाशीर्ष नव्याने उघडण्यात आले आहे.

४. “मॉडेल करिअर सेंटर” कार्यान्वीत करण्यासाठी केंद्र शासनाकडून रु.३८,०१,२६१/- (रु. अडतीस लाख एक हजार दोनशे एकसष्ट) एवढे अनुदान मंजूर करण्यात आले असून प्रथम टप्प्यात त्यातील रु.२२,८०,७५७/- (रु.बावीस लाख ऐंशी हजार सातशे सत्तावन्न फक्त) एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. सबब, त्यानुषंगाने पुरवणी मागणीद्वारे राज्य शासनाने रु.३८,०१,०००/- (रु.अडतीस लाख एक हजार फक्त) एवढा निधी मंजूर केला असून, त्यातील रु.२२,८०,७५७/- एवढा निधी प्रथम टप्प्यासाठी मंजूर करण्यात येत आहे. वित्त विभागाच्या अर्थोपाय कक्षाने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ४/अर्थोपाय दि.०४.०१.२०१६ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार रु.२२,८०,७५७/- (रुपये बावीस लाख ऐंशी हजार सातशे सत्तावन्न फक्त) इतका निधी दि.११.०९.२०१५ रोजी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाला आहे. तरी, सदर योजना राबविण्यासाठी येणारा खर्च उपरोक्त लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा .

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौसं.३२७/१४७१ दि.३०.१०.२०१५ व वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ २११/अर्थ-१८ दि.१६.११.२०१५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२५१५३६२५८३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Usha Prakash Mahajan

Digitally signed by Usha Prakash Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Usha Prakash Mahajan
Date: 2016.01.25 15:36:41 +05'30'

(उ.प्र.महाजन)
सह सचिव

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे प्रधान सचिव
३. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे प्रधान सचिव
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. सर्व विधानमंडळ सदस्य
७. मा.मुख्य सचिव ,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई
८. महालेखापाल (लेखा व लेखापरीक्षा) ½ मुंबई/ नागपूर
९. अवर सचिव , MMPcell, रोजगार महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय,भारत सरकार, ३/१० जाम नगर हाऊस, शहाजहान रोड, नवी दिल्ली-११ ००११
१०.आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय,कोकणभवन,नवी मुंबई
११.सहायक संचालक, जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , यवतमाळ
१२.कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.कार्यासन अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.कार्यासन अधिकारी (रोस्वरो-२), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवडनस्ती (रोस्वरो-१).